# राशिभविष्य - एप्रिल, २०२२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे**
**निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून, श्रद्धेने उपयोग करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

====================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू व हर्षल असे दोन ग्रह असून दिनांक ८ रोजी या राशीच्या व्ययस्थानी असलेला बुध व दिनांक १४ रोजी या राशीच्या व्यय स्थानी असलेला रवि असे दोन ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत येत आहेत. तसेच या राशीच्या लग्नस्थानी आलेला बुध दिनांक २४ रोजी या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत जात आहे. अशा परिस्थितीत रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे शरीरपीडा,अनारोग्य, मनस्ताप, एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. बुधामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, मानहानी होणे, अनारोग्य होणे, कुसंगतीची बाधा होणे, मनस्थिती चंचल होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात त्याच्यामुळे अर्थलाभ होण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे सुद्धा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी होईल, धाक, दडपण सहन होणार नाही; पण तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील राहूही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अपमान होतील. व काही मंडळींना वातविकार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे सुद्धा मनस्थिती अस्थिर राहील व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. दिनांक ७ रोजी या राशीच्या दशम स्थानी असलेला मंगळ या राशीच्या

लाभस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्याच्यामुळे नोकरीत कामाचा ताण, व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होईल. पण महिन्याच्या अखेरीस या राशीच्या काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. दशम स्थानी असलेल्या शनीमुळे पित्याशी मतभेद होतील व पटणार नाही. स्वभाव अहंकारी, हटवादी असा घडेल, हुकूमशाही वृत्ती वाढेल. हा शनि दिनांक २१ रोजी या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत जात आहे. . या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील गुरु व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धाच्या प्रारंभी या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत जात आहेत. तसेच शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु ग्रह सर्व प्रकारे अनुकुल होईल, व महिन्याच्या उत्तरार्धात अध्यात्म व समाजसेवा यांची मनापासून ओढ असणाराना अनुकुल होईल. पण प्रवासात त्रास, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. नेपच्यून महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नैराश्य येईल. पण हा नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून तो पूर्णपणे अनुकुल होईल. त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, मनस्थिती उदार होईल, व उच्च आचारविचार प्रकट होतील. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत शनि व मंगळ असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक ७ रोजी या राशीच्या दशम स्थानी जात असून शनि दिनांक २१ रोजी या राशीच्या दशम स्थानी जात आहे. अशा स्थितीत मंगळ पूर्णपणे प्रतिकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते, म्हणून शक्यतो त्या काळात प्रवास करू नका. हा मंगळ या राशीच्या दशम

स्थानी कुंभ राशीत गेल्यावर औषध विक्रेते  आणि यांत्रिकतांत्रिक कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल  होईल. पण इतर व्यवसायक्षेत्र  असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते.. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरवर्गाला नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी मतभेद  होतील. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत असलेला शनि कायदा, तत्त्वज्ञान, चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल.  या राशीच्या दशम स्थानी प्रथमपासून गुरु, शुक्र व नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु व  नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या लाभस्थानी मीन  राशीत  जात आहेत. शुक्र ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात  या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत

जाईल. अशा स्थितीत गुरु ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात  बौद्धिक, शैक्षणिक, संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, .प्रगतिकारक व लाभदायक होईल.  काही  मंडळींचा मानसन्मान होणेही संभवते. तसेच त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येईल, विद्यार्थ्यांना  सहज शैक्षणिक प्रगती करता येईल. अनेक मार्गांनी धनलाभ होणेही संभवते. येथील नेपच्यून महिन्याच्या पूर्वार्धात मनोवैज्ञानिक  व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक  होईल. पण महिन्याच्या  उत्तरार्धात तो प्रतिकुल  होणार असून त्याच्यामुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे ,यांचा  मनावर परिणाम होईल  व नैराश्य येईल. शिवाय काही मंडळींना कुमार्गी मित्रांमुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत असलेला शुक्र कला क्षेत्रातील मंडळींना प्रतिकुलच  होईल; पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी  मीन  या त्याच्या उच्च राशीत गेल्यावर तो अनुकुल होईल व  सर्व प्रकारे सुखशांती लाभेल व धनलाभही होईल. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि, बुध हे दोन ग्रह आहेतच. ते दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल, प्रगतिकारक, सुखदायक व लाभदायक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात  ते  या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत गेल्यावर प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे शरीरपीडा, मानहानी, अनारोग्य,  हाती घेतलेल्या कार्यात अपयश अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते.  या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे अर्थलाभ होईल व काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. पण  त्याच्यामुळे नातेसंबंधात भांडणे होणे संभवते. जपा.  हर्षल प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक समस्या  त्रस्त  करतील, वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागेल व  शत्रुत्व निर्माण

होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती व मनःशक्ती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्रये नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, गूढ संशोधन व अध्यात्म यांची आवड असणारांना तो अनुकुल होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक ७ पासून या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे अनारोग्याचा त्रास होणे संभवते. शिवाय तो वीज, पाणी यांपासून धोका सूचित करतो. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रवासात त्रास व मानहानी होणे संभवते म्हणून शक्यतो त्या काळात प्रवास करू नका. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत असलेला शनि अनारोग्य, दुःख, दैन्य देणारा असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु,शुक्र व नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी नेपच्यूनमुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल; पण तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. शुक्रामुळे गुरुकृपा, थोरकृपा प्राप्त होईल व सुखसमाधान लाभेल. गुरुमुळे सद्गुणांची प्राप्ती होईल, प्रगतीच्या संधी चालून येतील, प्रवास होईल व अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रथमपासून भाग्यस्थानी असलेले गुरु व नेपच्यून हे दोन ग्रह या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात आहे गुरु ग्रह बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभकारक होईल. नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, घोटाळे व अर्थप्राप्तीस विलंब होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे व्यवसायात अडचणी, अडथळे येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि आणि बुध हे दोन

ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होतील व नोकरी-व्यवसायात यशदायक व लाभदायक घटना घडतील. हा बुध दिनांक २४ पासून या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीतजात आहे. त्या काळात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानहानी, अपयश सहन करावे लागेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू व हर्षल हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. हर्षलमुळे निश्चित असे काय घडेल हे सांगता येणार नाही. सर्व काही अनिश्चित असेच घडेल. मित्रांशी भांडणे होतील व संततिसुखात बाधा येणे संभवते. राहूमुळे जुगाराचा नाद असणारांना व अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह अस्वस्थ करील. पण मनावर ताबा ठेवून हा मोह टाळाच. नपेक्षा नुकसानच होईल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " जगदंबा दुर्गा देवी स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह आहेत. पैकी शनीमुळे मनस्थिती शांत, विचारी वृत्ती होईल. पण मंगळामुळे जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, दोघांतील वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. येथील मंगळ दिनांक ७ रोजी या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्या काळात तो अधिकच प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचा आजार होणे संभवते. त्याशिवाय हाडमोड होणे, वीज-पाणी यांपासून धोका असणे संभवते. जपा. त्यामुळे नैराश्य येणेही शक्य आहे. येथील शनि दिनांक २१ रोजी या राशीच्या अष्टम स्थानी जात आहे. या अष्टम स्थानी कुंभ राशीत गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील गुरु-शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे, अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. शिवाय शुक्रामुळे काही

मंडळींना कमी श्रमांत अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होण्याची शक्यता दिसते. येथील गुरु-शुक्र-नेपच्यून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत जात आहेत. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. हे रवि -बुध दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होतील; व त्यांच्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. नियोजित कामात अडथळे, अडचणी येण्याची शक्यता आहे. त्याशिवाय मानसिक ताण, कार्यदिरंगाई, वडील मंडळींचा विरोध अशापैकी कारणांनी मन निराश होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध हे दोन्ही ग्रह या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गेल्यावर अनुकुल होतील व रविमुळे नोकरी-व्यवसायात मनोनुकुल, सुखकारक व लाभदायक घटना घडतील. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत आलेल्या गुरु-शुक्रामुळे प्रवासाचे योग येतील, अध्यात्माची आवड असणारांना आध्यात्मिक प्रगती करता येईल, गुरुकृपा व थोरकृपा लाभेल, ऐषाराम लाभेल. उत्कर्ष होईल, सद्गुण वाढतील, काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. नेपच्यूनमुळे

काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल हे दोन ग्रह आहेतच. तेथील राहू शासकीय नोकरीत असणारांना अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात यश लाभेल. क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांनाही तो लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती व मनःशक्ती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेनें ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी " ओम बृहस्पतये नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी " ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे मानसिक दुःख होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत शनि -मंगळ हे शत्रुग्रह असून येथील मंगळामुळे अनारोग्य होणे, अपप्रचाराचा त्रास होणे,अर्थहानी होणे संभवते. शनीमुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, गैरसमजुतीतून भांडणे होणे, वातविकार बळावणे संभवते. पण हे दोन्ही ग्रह दशम या व्यवसायस्थानास पूरक होतील. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु-शुक्र- नेपच्यून असे तीन ग्रह असून महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ सप्तम स्थानी कुंभ राशीत येत आहे. येथील गुरु ग्रहामुळे नवे स्नेहसंबंध जुळून येतील, जुने प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील, काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल, अर्थलाभ होणेही संभवते. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुख लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होणेही शक्य दिसते. पण नेपच्यूनमुळे . वैवाहिक जीवनात बाधा येणेही संभवते. मंगळामुळेही वैवाहिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत बाधा न येण्याची काळजी घ्यावी. महिनाअखेरीस षष्ठ स्थानी असलेला शनि या सप्तम स्थानी कुंभ राशीत येत आहे. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत रवि व बुध असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत असलेले गुरु, शुक्र व नेपच्यून हे तिन्ही ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत येत आहेत. येथील रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, नियोजित कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे संभवते. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व कार्यसिद्धीचे सुख लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. तसेच त्याच्यामुळे भांडणे होणेही संभवते. गुरु-शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होऊ शकेल. येथील नेपच्यून जलभय-विषभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील राहूमुळे शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना फिरतीची कामे करावी लागतील. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल,

प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याशिवाय त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या भाग्यस्थानी असलेला बुध या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्या काळात या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुख लाभेल.

श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना अनकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र
उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या - .** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असल्यामुळे या राशीच्या मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करण्याची दाट शक्यता आहे. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे संततीच्या आचरणविषयक समस्या त्रस्त करतील. हा मंगळ दिनांक ७ पासून या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्या काळात अनारोग्य, अपप्रचार, आर्थिक हानी, चोरी होणे अशापैक्री घटना असह्य मनस्ताप देण्याची शक्यता आहे. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या शनिमुळे चिकाटीचा गुण वाढेल. पण बुद्धी व्यवहारी, संशयी, स्वार्थी होण्याची शक्यता दिसते. हा शनि महिनाअखेरीस या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरुमुळे आरोग्य सुधारेल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गेल्यावर नवे स्नेहसंबंध जुळून येतील. विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. प्रवासाचे योग येतील. आर्थिक लाभ होणेही शक्य दिसते. शुक्र कलाक्षेत्रातील मंडळींना प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कलागुण असूनही प्रकटीकरणास संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गेल्यावर प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत असलेल्या नेपच्यूनमुळे महिन्याच्या

पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा मनस्ताप सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात हा नेपच्यून या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गेल्यावर या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करीतसे वाटते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि व बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील बुध दिनांक ८ रोजी या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत जात आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रविही या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत जात आहे. पण हा रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, अपयश, संततिसुखात बाधा अशापैकी घटना मनस्ताप देण्याची शक्यता दिसते. पण बुध महिन्याच्या प्रथम सप्ताहात प्रतिकुल होईल व नंतरच्या सम्पूर्ण काळात अनुकुल होईल व यश, सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल व राहू असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील हर्षल अपघातकारक असल्याने सतत सर्व ठिकाणी सावधानतेने आचरण करा. येथील राहूमुळे ज्यांच्या हाती अधिकार पद आहे अशापैकी काहींना वाममार्ग धन कमावण्याचा जबरदस्त मोह होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो मोह टाळावाच. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर दुर्गा देवीची व शिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती आणि मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "दुर्गा देवी स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो सुखकारक होईल; पण त्याच्यामुळे वाहन धोका संभवतो. म्हणून सतत सावधातेने वाहन चालवा व रस्त्याने सतत लक्षपूर्वक चाला. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून त्यांच्यामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. तसेच मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याचीही दाट शक्यता दिसते. जपा. येथील मंगळ दिनांक ८ रोजी व शनि महिनाअखेरीस या

राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत जात आहेत. त्या वेळी मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील; तर कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. काही मंडळींना स्थावरसंबंधीची समस्या मनस्ताप देईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु, शुक्र, नेपच्यून असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील गुरु व नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात आणि शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत जात आहेत. गुरु ग्रह या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस अनुकुल होईल, आर्थिक लाभ होतील, प्रेमसंबंध दृढ होतील. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. शुक्र ग्रह या राशीच्या पंचम स्थानी असताना सर्व प्रकारच्या कलात्मक शिक्षण घेत असणाऱ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गेल्यावर मात्र कलागुण प्रदर्शित करण्यास संधीच मिळणार नाही. नेपच्यून पंचम स्थानी कुंभ राशीत असताना मनस्थिती अत्यंत भावनाप्रधान होईल. पण तो अध्यात्म व गूढ संशोधन यांची मनापासून ओढ असणारांना अनुकुल व यशदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गेल्यावर काल्पनिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींना फसवणूक झाल्याची चिंता मनस्ताप देईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि आणि बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील रवि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील. पण तो अनारोग्यकारक होणार असला तरी भाग्योदयकारकही होईल. बुध ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना धनलाभ होणे संभवते; तर काही मंडळींना प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते. येथील रवि -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत गेल्यावर प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे दु:ख, भांडणे, अनारोग्य, यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे आर्थिक नुकसान होणे, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, मनात कपटी विचार येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. हर्षलमुळे पतिपत्नीत वाद, भांडणे, दोघापैकी कोणाकडून तरी विक्षिप्त आचरण होणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील बुध या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यावेळी तो अनुकुल व सुखकारक होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना" मन:शक्ती व मन:शांती देईल. म्हणून दररोज सकाळी

स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी असा होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळ दिनांक ७ रोजी या राशीच्या चतुर्थ स्थानी .कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे हा मंगळ कौटुंबिक सुखास बाधक होईल. गैरसमज, वाद, भांडणे, घडणाऱ्या असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. शनीमुळे या राशीच्या काही मंडळींना मनापासून अपेक्षित असलेली नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. हा शनि महिनाअखेरीस या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु-शुक्र दोन्ही ग्रह कौटुंबिक सुखास अनुकुल होतील. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार असतील तर ते अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. शुक्रामुळे सुखसमाधान व ऐषाराम प्राप्त होईल. शिवाय शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल. नेपच्यूनमुळेसुद्धा घरगुती गोष्टींबाबत गैरसमज, घोटाळे होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील गुरु-शुक्र-नेपच्यून हे तिन्ही ग्रह या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत जात आहेत. त्यावेळी नेपच्यूनमुळे मनस्थिती अति भावनाशील होईल, पण तो अध्यात्म व गूढ संशोधन यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शुक्र या राशीच्या सर्व प्रकारच्या कलावंतांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. गुरुमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शिवाय त्याच्यामुळे प्रेमसंबंध असणारांचे प्रेमसंबंध दृढ होतील. सर्व प्रकारे तो सुखकारक होईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत रवि -बुध हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील बुध दिनांक ७ रोजी या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे तो प्रतिकुलच होईल’ व त्याच्यामुळे दुःख, भांडणे होणे संभवते. रवि ग्रह

महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल. त्याच्यामुळे आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. पण तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल व हितशत्रू पराभूत होतील. येथील बुधही अनुकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात यश मिळेल. धन प्राप्त होईल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. तेथील राहू ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशाना लाभदायक होईल. पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. येथील हर्षलमुळे मनस्थिती चंचल होईल, काही मंडळींना मुदतीचा ताप येऊ शकेल, शिवाय सतत अति खोल विचार करत बसाल तर डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. पण हा हर्षल दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. महिनाअखेरीस येथील बुध या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत जात आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नम::” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नम::”तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तो पूर्णपणे अनुकुल होईल व सुख, यश, खूप प्रवास, अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून

येथील मंगळ दिनांक ७ रोजी या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या प्रथम सप्ताहानंतर तो अनुकुल होईल, व त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल. हातून कर्तृत्व घडेल. शिवाय प्रवास योग येणेही संभवते. पण धनस्थानी असलेल्या शनीमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची सूचना मिळते. जपा. त्याशिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. महिना अखेरीस हा शनि या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहे. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु -शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु या राशीच्या लेखकाना अनुकुल होईल, त्यांना प्रवासाचे योग येतील; पण भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला

जाणे संभवते. शुक्रामुळे या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींचा सन्मान होऊन त्यांना प्रतिष्ठा प्राप्त होणेही शक्य आहे. . येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. त्यामुळे या राशीचा ज्या मंडळींना अध्यात्म व गूढ संशोधन कार्याची आवड आहे त्यांना तो अनुकुल होईल व त्यांची आध्यात्मिक प्रगती होईल. गूढ संशोधन कार्यात प्रगती व यश प्राप्त होईल. येथील गुरु-शुक्र-नेपच्यून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत जात आहेत. त्या काळात नेपच्यूनमुळे गैरसमज, वाद अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. . जपा. पण गुरु ग्रहामुळे परिस्थिती अटोक्यात राहील व अपेक्षित सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्री संबंधीचे व्यवहार अपेक्षेनुसार पूर्ण होतील. असे असले तरी एखाद्या नातेसंबंधातील व्यक्तीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. शुक्रही अनुकुल असून ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून लाभ होईल.व ऐषाराम लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि व बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील बुध दिनांक ७ पासून व रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत जात आहेत. महिन्याच्या संपूर्ण काळात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील. व त्यांच्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. शिवाय कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण बुधामुळे काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख लाभू शकेल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू व हर्षल असे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. त्याशिवाय या राशीच्या काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे, निर्माण होण्याचीही शक्यता दिसते. पण येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. महिनाअखेरीस येथील बुध या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत जात आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा

आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नम::” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत ,मंगळ व शनि असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, शरीरपीडा, श्रम, दगदग सहन करावी लागेल. त्याशिवाय उष्णता किंवा वातविकाराचा आजार अस्वस्थ करील. नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील, तसेच आर्थिक चिंताही त्रस्त करतील. प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत गुरु-शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह असून महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहापासून मंगळ या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जात आहे. महिनाअखेरीस शनि या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जाईल. या राशीच्या धनस्थानी असलेले गुरु-शुक्र अनुकुल असल्यामुळे या राशीच्या सर्वांना कौटुंबिक सुख लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. धनलाभ होईल.पण येथील नेपच्यून प्रतिकुल होईल व आर्थिक समस्या त्रस्त करतील. हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत जात आहेत. त्या काळात नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होण्याची शक्यता आहे. पण तो अध्यात्म व गूढ विद्या अशापैकी एखाद्या गोष्टीत मनापासून रस असणारांना अनुकुल होईल व त्या क्षेत्रात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. शिवाय काही मंडळींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. गुरु ग्रह या राशीच्या लेखकांना अनुकुल होईल; पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे काही मंडळींना धनलाभ तर काहींना भूमिलाभ होणे संभवते. काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील बुध दिनांक ८ रोजी रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत जात आहेत. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व सुख, धन प्राप्त होईल, नोकरदार मंडळींच्या कार्यकुशलतेवर वरिष्ठ प्रसन्न होतील, आरोग्य उत्तम राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक त्रास, कार्य दिरंगाई, आर्थिक चिंता, अनारोग्य अशापैकी मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. पण बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू व हर्षल हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. पण हे दोन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात

प्रतिकुलच होतील व राहूमुळे कौटुंबिक त्रास, अन्य कटकटी सहन कराव्या लागतील. हर्षलमुळे कोणाशी पटणार नाही, कशातच सुखसमाधान लाभणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. येथील बुध महिनाअखेर या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत जात आहे. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी " हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे असून ग्रह असून संपूर्ण महिन्याच्या काळात हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यांच्यामुळे आर्थिक संकटे,चिंता, वाद, भांडणे, होतील व त्यामुळे मन अस्वस्थ राहील .जपा. येथील मंगळ दिनांक ८ रोजी या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत येत आहे. महिना अखेर येथील शनि प्रथम स्थानी याच राशीत येईल. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी प्रारंभापासून गुरु-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र व सर्व प्रकारचे लेखन करत असणाऱ्या लेखकांना अनुकुल व यशदायक होईल. शुक्रामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. पण येथील नेपच्यूनमुळे मानसिक संवेदना जलद होतील व त्यामुळे मन उदास होऊन नैराश्य येणे संभवते. हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मीन राशीत आहेत. त्यावेळी नेपच्यून प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण गुरु-शुक्रामुळे कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. आर्थिक लाभही होतील. शुभ घटना घडतील. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत प्रथमपासून रवि व बुध हे दोन ग्रह आहेतच. पण येथील रवि,बुध हे दोन्ही ग्रह प्रतिककुलच होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होतील, तसेच त्यांच्यामुळे आर्थिक चिंताही मनस्ताप देतील. येथील बुध दिनांक ७ रोजी व रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत जात आहेत. त्यावेळी रवि अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व सुखसमाधान लाभेल, आणि या राशीच्या शासकीय

नोकरदार मंडळींना बढती मिळेल, वरिष्ठ कार्यकुशलतेवर प्रसन्न होतील, काहीजणांचा सन्मान होईल व क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण बुध प्रतिकुलच होईल. त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत प्रारंभापासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहू व हर्षल हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील; पण राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व त्यांना आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिव शंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन** - या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून दिनांक ८ रोजी येथील मंगळ या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जात आहे. शनि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात याच राशीत असल्यामुळे सर्वसाधारणपणे तो अनुकुलच होईल. आर्थिक वाढ होणे संभवते. पण तो संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. हा शनि दिनांक २१ रोजी या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जात आहे. मंगळ पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे खूप कष्ट व मनस्ताप सहन करूनच अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी प्रयत्न करावे लागतील. त्याशिवाय मित्रांशी वितुष्ट येणे, उष्णताविकार बळावून उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. पैकी शुक्र सर्वसाधारणपणे शुभच होईल व त्याच्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. गुरु ग्रह अध्यात्म व सामाजिक कार्याची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल नेपच्यूनमुळे कसली तरी चिंता अस्वस्थ करील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल व यशदायक होईल. येथील गुरु-शुक्र-नेपच्यून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. या प्रथम

स्थानी याच राशीत प्रथमपासून रवि -बुध हे दोन ग्रह आहेतच. येथील बुध दिनांक ८ रोजी व रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मेष राशीत जात आहेत. त्याकाळात हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे थकवा येणे, अनारोग्याचा त्रास सहन करावा लागणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, वाद, भांडणे होणे, मित्रद्रोह होणे, कुसंगतीची बाधा होणे, मनस्थिती अस्थिर, चंचल होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता आहे. हर्षलमुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल व अविचाराचे आचरण हातून घडेल. त्यातून आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होते आहे, हेही लक्षात येणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती व मनःशक्ती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====00000O00000=====